**G.S.Mandal's**

**Marathwada Institute of Technology, CIDCO, Aurangabad**

**Academic Year 2022-23**

## Published the College Activity / News in Media


















PRO Coordinator

PRINCIPAL
M.I.T. Cidco, Aurangabad

आपण वाचत आहात देशातील सर्वात विश्वासार्ह अन् प्रथम क्रमांकाचे वृत्तपत्र
दिव्य मराठी

शनिवार १२ ऑगस्ट २०२३

# बेकारांची फौज तयार करणे हा शिक्षणाचा उद्देश नाही

## कुलगुरू डॉ. येवले यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर



एमआयटी सिडको महाविद्यालयात नॅशनल सेमिनारचे डॉ. येवलेंच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

उद्योगाच्या गरजेनुसार अभ्यासक्रमाची रचना करणे आज काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि प्रेरणेसोबतच कौशल्यावर आधारित शिक्षणावर भर द्यावा लागेल. डिग्री किंवा डिप्लोमा घेऊन बेकारांची फौज तयार करणे हा शिक्षणाचा उद्देश नाही, तर इंडस्ट्रीजला आवश्यक असलेल्या कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम देऊन त्यांना वेळेत नोकरी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे यात शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक अभ्यासक्रम हे अजूनही बदललेले नाहीत. त्यासाठी आज नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. प्रमोद येवले यांनी केले. एमआयटी सिडको महाविद्यालय येथे नॅक प्रायोजित दोनदिवसीय नॅशनल सेमिनारचे उद्घाटन कुलगुरू डॉ. येवले यांच्या हस्ते करण्यात आले त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जी. एस. मंडळाचे संचालक मुनीश शर्मा होते. प्रो. एन. एन. बंदेला, डॉ. विष्णू पाटील, प्राचार्य डॉ. नितीन भालकीकर यांची उपस्थिती होती. उपप्राचार्य डॉ. महेंद्र कोंडेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सोनल बच्छाव यांनी सूत्रसंचालन केले.

PRO coordinator

PRINCIPAL
M.I.T. Cidco, Aurangabad

आदर्श गावकरी

# जीवनात पाणी महत्त्वाचा घटक : प्रशांत अवसरमल



औरंगाबाद : आपल्या जीवनात पाणी हे अंत्यत महत्वाचा घटक असून, त्याचे संवर्धन व जतन करणे काळाची गरज आहे. त्यामुळे नदी नाल्याव्दारे वाहून जाणारे पाणी श्रमदान शिबिर राबवून 'पाणी आडवा पाणी जिरवा' ही मोहीम हाती घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. प्रशांत अवसरमल यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत एम आयटी महाविद्यालय सिडको यांच्या वतीने भांबर्डा (ता.जि. (औरंगाबाद) येथे विशेष शिबिरात १६ जानेवारीपासून सुरू झाले. उद्घाटनप्रसंगी अवसरमल बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. महेंद्र कोंडेकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच इंदू पठाडे होत्या. याप्रसंगी उपसरपंच सजन शिंदे, ग्रा. पं.सदस्य संतोष फुकटे, विजय काकडे, राजेंद्र काळे, श्रीराम भवर, सुमनबाई दिवटे, शालेय समिती होती.

अध्यक्ष भीमराव पठाडे, तंटामुक्त समिती अध्यक्ष बळीराम काळे, शालेय समिती उपाध्यक्ष सोमिनाथ जाधव, शिक्षक जिजा उकर्डे, जीवन साळुंके, प्रा. संजय काळे, प्रा. भास्कर कदम, प्रा. सुषमा सपकाळ, प्रा. मधुकर जंजिरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी विजया पाटील, सचिन कोल्हे हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम जलसाक्षरतेची शपथ सर्व गावकऱ्यांसोबत घेतली. या सात दिवशीय शिबिरात वृक्षारोपण, झाडांना व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन व शालेय विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान या विषयावर सात दिवस कार्यशाळा घेण्यात येणार आहे. प्रास्ताविक एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्रा. विजया पाटील यांनी केले, तर सूत्रसंचालन रोहित जवरे यांनी केले. याप्रसंगी एनएसएसच्या अनेक विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Auranagabad Edition
19 Jan, 2023 Page No. 11
Powered by : eReleGo.com

PRO coordinator

PRINCIPAL
M.I.T. Cidco, Aurangabad